ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV October - December - 2018

Marathi / Hindi Part - III

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | बुलढाणा जिल्ह्यातील लोकसंख्या घनतेचा भौगोलिक अभ्यास<br>**कु. देऊबाई लक्ष्मण घुले**<br>**डॉ. मदनलाल विनायकराव सुर्यवंशी** | ६२-६५ |
| १४ | मध्ययुगातील वारकरी संप्रदाय एक तत्वज्ञान<br>**डॉ. सुलभा अंबादासराव मुरलीधर** | ६६-६९ |
| १५ | उच्च शिक्षणातील अध्यपनातील बदलते स्वरूप अध्यापन कौशल्य (ऑनलाईन टिचींग)<br>**प्रिया प्रकाश मोरे**<br>**डॉ. धनंजय वडमारे** | ७०-७२ |
| १६ | नाशिक जिल्ह्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शासनाच्या सुविधांचा अभ्यास<br>**सिध्दार्थ कचरु कुलकर्णी**<br>**डॉ. अनंत अश्रुबा चौधरी** | ७३-७६ |
| | स्थानिक नियोजनातून ग्रामीण विकास<br>**डॉ. पंडित शेषराव नलावडे** | ७७-८१ |
| | फुले - आंबेडकरवादी साहित्य आणि समकालीन वास्तव<br>**प्रा. डॉ. संजय शिंदे** | ८२-८४ |
| | दलितांचे सेवैधानिक संरक्षण : एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. एल. यु. मेश्राम** | ८५-८७ |
| | भारतीय शिक्षणाचा इतिहास<br>**प्रा. डॉ. गणेश कड** | ८८-९३ |
| | चैत्रबन मधील भक्तिकाव्यधारा<br>**प्रा. डॉ. अनिरुध्द मोरे** | ९४-९६ |
| | लघुपत्रिकेतील कवितेचे स्वरुप आणि व्याप्ती<br>**डॉ. अशोक गणपतराव पाठक** | ९७-९९ |
| | भारिप बहुजन महासंघाचा महाराष्ट्राच्या राजकारणात सहभाग आणि त्याचे राजकारण<br>**प्रा. डॉ. गजानन गजभिये** | १००-१०६ |
| | भारतीय लोकशाहीची राजकीय प्रक्रिया : एक दृष्टिक्षेप<br>**प्रा. डॉ. कटारे बी. डी.** | १०७-१०९ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २२. लघुपत्रिकेतील कवितेचे स्वरुप आणि व्याप्ती

**डॉ. अशोक गणपतराव पाठक**
मराठी विभाग, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, ता. परतूर, जि. जालना.

लघुपत्रिकेतील कवितेचा अभ्यास करतांना असे लक्षात येते की, ही एक महत्वाची चळवळ आहे. क्रांतीकारक अशी घटना आहे. तत्कालीन प्रस्थापित अशा व्यवस्थेविरुध्दची बंडखोरी आहे. गुळगुळीत झालेल्या साहित्य व्यवस्थेविरुध्दची ही बंडखोर अशी प्रतिक्रिया आहे. या चळवळीतील लेखक-कवींची साहित्य निर्मिती म्हणजेच या चळवळीचे तत्वज्ञान आहे. लघुपत्रिकेतील लेखक-कवींनी आज स्वत:चा असा वेगळा चेहरा निर्माण केलेला आहे. अशोक शहाणे, भालचंद्र नेमाडे, दिलीप चित्रे, अरुण कोल्हटकर, चंद्रकांत पाटील, वसंत डहाके, सतीश काळसेकर, तुलसी परब, नामदेव ढसाळ ही ती आजची महत्वाची नावे आहेत.

१९६० हे वर्ष खरं तर मराठी साहित्यविश्वात परिवर्तन घडवणारे वर्ष मानले जाते. या कालखंडात जवळ-जवळ शंभर लघुपत्रिका समोर आल्या. या चळवळीच्या अभिव्यक्तीचे मुख्य माध्यम हे कविता होते. मुंबईसारख्या महानगरातून ही चळवळ सुरु झाल्यामुळे अर्थात शहरीकरणाचे सगळे दोष, शहरातील यंत्र मानवाला आलेले अपंगत्व आणि नैराश्य भावना या चळवळीचा मुख्य विषय बनत गेला. १९५५ ते १९७० हा लघुपत्रिकेचा मुख्य कालखंड होय. केशवसुत आणि त्यांच्या वळणाची कविता, रविकिरण मंडळाची कविता ह्यांची काव्यपरंपरा मोडीत काढून नवी अशी कविता, नवं असं साहित्य वाचकाला देण्याचा प्रयत्न म्हणजेच लघुपत्रिकेतील कविता होय.

देशीयतेला वाढवण्याचं, बळ देण्याचं काम या लघुपत्रिकेतील कवितेने केलं आहे. महाराष्ट्रातील सर्वच संतकवींनी इथली देशी चळवळ टिकवून ठेवण्याचं फार मोठ कार्य केलेलं आहे. इथली भाषा, इथली कला जपण्याचा मन:पूर्वक असा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. मानवी जीवनातील विदारक समस्यांवर, दु:खावर आपल्या भक्तीच्या मार्गाने जनसामान्यांची मानसिकता तोलून धरलेली आहे. अठराव्या शतकानंतर इंग्रजी अमल सुरु झाला. इंग्रजांची भाषा, त्यांचे साहित्य, संस्कृती ह्यांनी इथल्या भूमिवर जो करायचा तो परिणाम केलाच. इंग्रजांच्या या प्रभावकाळात अनेक मराठी साहित्यिक, समीक्षक यांनी इंग्रजी संस्कृतीचे गुणगाण गायलेही आणि त्या संस्कृतीला रुजविण्याचा प्रयत्नही केला.

संतसाहित्य, इंग्रजी साम्राज्याचा अमल, औद्योगिकरण, केशवसुत आणि रविकिरण मंडळाची कविता हया सगळ्या पार्श्वभुमीवर लघुपत्रिकेतील कवितेचे स्वरुप आपल्याला पाहता येईल.

**१. आधुनिक जाणिवा**

दोन्ही महायुध्दानंतरचा कालखंड आणि त्यातून समोर आलेले महाभयंकर असे यांत्रिकीकरण, औद्योगिकिकरण यामुळे मानवी जीवन कोरडे आणि अर्थशून्य व्हायला सुरुवात झाली याच काळापासून खरं तर माणूस हा वस्तूंच्या आहारी जायला सुरुवात झाली. त्यामुळे मानवी जीवन हे शुद्रवत वाटायला लागले. अमेरिका आणि युरोपातील अनेक देशातील